महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : २११ वे दिनांक : २५/०७/२०२६ वार : शनिवार

## नाशिकात पदवीदानाचा महासोहळा; १२,२४६ विद्यार्थ्यांना डिग्री



**नाशिक** : महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा २५ वा दीक्षांत समारंभ मंगळवार, दि. २८ जुलै २०२६ रोजी नाशिक येथील विद्यापीठ मुख्यालयात उत्साहात आयोजित करण्यात आला आहे. विद्यापीठाचे कुलगुरू (अतिरिक्त कार्यभार) प्रा. संजीव सोनवणे यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, या दीक्षांत समारंभाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे मा. कुलपती तथा राज्यपाल श्री. जिष्णु देव वर्मा उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाला विद्यापीठाचे प्र-कुलपती तथा राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री मा. नामदार श्री. हसन मुश्रीफ, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या मा. राज्यमंत्री श्रीमती माधुरी मिसाळ आणि नागपूर येथील 'एम्स' (AIIMS) चे अध्यक्ष डॉ. अनंत पंढरे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील.

विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ यांनी दिलेल्या माहितीनुसार, हा सोहळा विद्यापीठ आवारातील 'शिक्षक प्रशिक्षण प्रबोधिनीत' सकाळी ११.०० वाजता पार पडणार आहे. सर्व प्राधिकरण सदस्य, संलग्नित महाविद्यालये, शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि अभ्यागतांनी या सोहळ्याची नोंद घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले आहे.

परीक्षेबाबत सविस्तर आकडेवारी देताना परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू यांनी सांगितले की, या समारंभात विविध अभ्यासक्रमांचे इंटर्नशिप पूर्ण केलेल्या एकूण १२,२४६ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात येणार आहे. यामध्ये पदवी व पदव्युत्तर शाखेचे ८,५४७ विद्यार्थी, एम.फिल.चे ०६ विद्यार्थी आणि २० विद्यार्थ्यांना पी.एच.डी. पदवी दिली जाईल.

उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या एकूण ९९ गुणवंत विद्यार्थ्यांना १३९ सुवर्णपदकांनी (Gold Medals) सन्मानित केले जाणार आहे. यासोबतच आरोग्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल डॉ. सदानंद प्रभाकर सरदेशमुख यांना विद्यापीठाची मानाची 'डी.लिट' (D.Litt.) ही मानद पदवी प्रदान करण्यात येणार आहे. या भव्य दीक्षांत समारंभास शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि अभ्यागतांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## प्रधानांच्या निर्णयावर मोदींचाच अंतिम शिक्का!

**मुंबई** : दिल्लीसह महाराष्ट्रात पेटलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर राज्य आणि केंद्र सरकार अत्यंत संवेदनशील व सकारात्मक असून येत्या 1 ते 2 दिवसांत केंद्र सरकारकडून याप्रकरणी मोठा आणि महत्त्वपूर्ण निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे, असा दावा एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे आमदार संजय शिरसाट यांनी पत्रकार परिषदेत केला. "आंदोलक विद्यार्थ्यांवरील गुन्हे मागे घेणे, त्यांना चर्चेसाठी आमंत्रित करणे आणि गैरप्रकारांवर कठोर कायदा आणणे यासाठी सरकार प्रयत्नशील आहे," असे सांगत, आंदोलनात जखमी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचा संपूर्ण वैद्यकीय खर्च सरकार उचलणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच धर्मेंद्र प्रधानांबाबत निर्णय घेण्याचा अधिकार पंतप्रधानांना असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या मोर्चावर बोलताना संजय शिरसाट म्हणाले, "राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांना लोकशाहीत मुंबईत मोर्चा काढण्याचा पूर्ण अधिकार आहे. परंतु, सरकारनेही या आंदोलनाला अत्यंत गांभीर्याने घेतले आहे. विद्यार्थ्यांवरील गुन्हे मागे घेणे, त्यांना सहकार्याची भूमिका दाखवणे आणि चर्चेसाठी निमंत्रण देणे ही पावले सरकारने उचलली आहेत."

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीवर आणि विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर बोलताना संजय शिरसाट म्हणाले, "धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घ्यावा की नाही, हा सर्वस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदींचा अधिकार आहे. मात्र, येत्या 1 ते 2 दिवसांत केंद्र सरकार या कोंडीवर मोठा आणि मार्ग काढणारा निर्णय घेईल. संसद अधिवेशनात 'पेपरफुटी'विरोधात अत्यंत कठोर कायदा आणून विद्यार्थ्यांना दिलासा दिला जाईल."

आंदोलनातील हिंसक घटना आणि पोलिसांवर लागलेल्या आरोपांवर बोलताना संजय शिरसाट म्हणाले, "दादर किंवा इतर भागांतील आंदोलनादरम्यान काही बोगस लोक, ज्यांच्या छातीवर बिल्ला नाही किंवा ओळख नाही, ते काठ्या घेऊन आंदोलनात घुसताना दिसले आहेत. आंदोलन भडकवणे आणि लाठीचार्ज घडवून आणणे यासाठी काही समाजकंटक हे कृत्य करत आहेत. त्यामुळे उद्याच्या मोर्च्याबाबत राज ठाकरेंनी अशा उपद्रवींना धडा शिकवण्याची जी भूमिका घेतली आहे, ती योग्यच आहे."

संजय शिरसाट म्हणाले, "टॅक्सीतील तरुणाला 50 ग्रॅमची पावडर टाकून आत टाकण्याची धमकी देणाऱ्या सायन पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्याला मुख्यमंत्र्यांनी तातडीने निलंबित केले आहे. या आंदोलनाकडे सरकार कोणत्याही राजकीय अँगलने पाहत नसून पूर्णपणे सहानुभूतीने पाहत आहे."

पंतप्रधान नरेंद्र मोदी घाबरले होते आणि रात्री 12 वाजता माध्यमांवर आले, या खासदार संजय राऊत यांच्या विधानाचा शिरसाट यांनी अत्यंत कठोर शब्दांत समाचार घेतला. "संजय राऊत मूर्खासारखे बोलत आहेत. देशाचे पंतप्रधान रात्री 8 ते 12 वाजेपर्यंत भयभीत होते हे पाहायला राऊत काय त्यांच्या पायाशी बसले होते का? की काय जादूटोणा करत होते? कोणतीही पायाभूत माहिती नसताना काहीही विधाने करणे हा राऊत यांचा धंदाच झाला आहे आणि त्यांच्या विधानांना आता कोणीही गांभीर्याने घेत नाही," असे संजय शिरसाट म्हणाले.

## CSR निधीत मुंबईचाच सिंहाचा वाटा!

**मुंबई** : कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (CSR) निधीचा मुख्य उद्देश वंचित आणि मागास भागांचा विकास साधून समाजहिताचे प्रकल्प राबवणे हा असला, तरी महाराष्ट्रातील आर्थिक वर्ष २०२४-२५ मधील वास्तव याच्या अगदी उलट आहे. ताज्या आकडेवारीनुसार, राज्यात खर्च झालेल्या सीएसआर निधीतील सर्वाधिक वाटा आधीच विकसित असलेल्या जिल्ह्यांना मिळाला असून, खऱ्या अर्थाने गरज असलेल्या मागास जिल्ह्यांच्या वाट्याला मात्र अत्यल्प निधी आला आहे. परिणामी, 'जिथे आधीच विकास आहे तिथेच अधिक विकास' आणि 'जिथे विकासाची खरी गरज आहे तिथे निधीचा दुष्काळ' असा स्पष्ट विरोधाभास या खर्चातून समोर आला आहे.

केंद्राच्या अधिकृत आकडेवारीनुसार, आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये राज्यात एकूण ८,६३०.८० कोटी रुपयांचा CSR निधी खर्च करण्यात आला असून, या निधीच्या वितरणातील मोठी तफावत धक्कादायक आहे. राज्यातील एकूण निधीपैकी तब्बल ५१ टक्के म्हणजेच सर्वाधिक ४,४३६.५६ कोटी रुपये एकट्या मुंबई जिल्ह्यात खर्च झाले आहेत. यानंतर पुणे (१,८७१.१८ कोटी), ठाणे (३९३.४९ कोटी), नागपूर (२५५.३२ कोटी), रायगड (२४५.६० कोटी) आणि नाशिक (२२६.६४ कोटी) या आधीच विकसित असलेल्या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. याउलट, ज्या जिल्ह्यांना सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी या निधीची सर्वाधिक गरज आहे, त्यांच्या वाट्याला मात्र अतिशय तुटपुंजी रक्कम आली असून, यामुळे सीएसआर निधीच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जात असल्याचे चित्र आहे.

राज्यात सीएसआर (CSR) निधीच्या खर्चात वाढ होत असली, तरी त्याचे भौगोलिक वितरण अत्यंत विषम असल्याचे चित्र आहे. बहुतांश कंपन्या आपला सीएसआर निधी प्रामुख्याने महानगरांमध्ये किंवा त्यांच्या उद्योग क्षेत्राच्या आसपासच खर्च करत असल्याने, आधीच विकसित असलेल्या भागांचा अधिक विकास होतो आणि दुर्गम तसेच आदिवासी जिल्हे विकासापासून वंचित राहतात. ही दरी भरून काढण्यासाठी आणि राज्याचा समतोल विकास साधण्यासाठी ग्रामीण, आदिवासी, दुष्काळग्रस्त तसेच मागास जिल्ह्यांकरिता स्वतंत्र 'सीएसआर प्रोत्साहन धोरण' किंवा किमान निधी वाटपाची प्रभावी निश्चित यंत्रणा राबवणे अत्यंत गरजेचे झाले असल्याचे मत आहे.

राज्यातील इतर भागांप्रमाणेच विदर्भातही सीएसआर निधीच्या वाटपात मोठी तफावत दिसून आली आहे. एकीकडे नागपूर जिल्ह्यात २५५.३२ कोटी रुपयांचा समाधानकारक सीएसआर निधी खर्च झाला असला, तरी गोंदिया (८.२७ कोटी), भंडारा (९.८९ कोटी), अकोला (१४.४६ कोटी), वाशिम (६.४२ कोटी) आणि हिंगोली (४.८५ कोटी) यांसारख्या जिल्ह्यांच्या वाट्याला अतिशय तुटपुंजा निधी आला आहे. दुसरीकडे, खनिजसंपत्तीने समृद्ध असलेल्या चंद्रपूर (७३.१५ कोटी) आणि गडचिरोली (६२.५५ कोटी) या जिल्ह्यांना तुलनेने काहीसा अधिक निधी मिळाला असला, तरी तेथील गंभीर सामाजिक गरजा आणि भौगोलिक आव्हाने लक्षात घेता हा मिळालेला निधीही अत्यंत अपुरा असल्याचे स्पष्ट होते.

मराठवाड्याचा विचार केल्यास, एकीकडे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १८६.९० कोटी रुपयांचा लक्षणीय सीएसआर निधी खर्च झाला असला, तरी दुसरीकडे बीड (३१.४१ कोटी), धाराशिव (३८.४० कोटी), परभणी (२०.९५ कोटी), नांदेड (११.६९ कोटी) आणि जालना (१३.४९ कोटी) या जिल्ह्यांच्या वाट्याला तुलनेने अतिशय कमी निधी आला आहे. हे जिल्हे सततचा दुष्काळ, बेरोजगारी आणि शैक्षणिक मागासलेपणासारख्या गंभीर समस्यांशी झुंज देत असतानाही, त्यांच्या विकासासाठी येणारा सीएसआर निधीचा ओघ अत्यंत मर्यादित राहिल्याचे या तफावतीवरून स्पष्ट होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनीवार २५ जुलै २०२६


## उमरगा तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व व समाधान शिबिर संपन्न; ९ हजार ५८५ रुग्णांची तपासणी



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवणे, शासकीय योजनांमध्ये पारदर्शकता आणणे आणि गतीशील प्रशासनाद्वारे योजना थेट घरापर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने उमरगा येथील आदर्श महाविद्यालय येथे बुधवारी (ता. २२) रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर आणि महाआरोग्य शिबिर अत्यंत उत्साहात पार पडले.महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आणि राज्याचे लोकनेते अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी मंत्री तथा आमदार बसवराज पाटील यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले.या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रवीण स्वामी, जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार, जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापुराव पाटील, मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्त्यांचे सहअध्यक्ष तथा संयोजक शरण पाटील, उपविभागीय अधिकारी दत्तु शेवाळे, तहसीलदार गोविंद येरमे, तहसीलदार रणजितसिंह कोळेकर, वैद्यकीय अधीक्षक डॉ. कोमल गरड, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. उमाकांत बिराजदार, प्राचार्य डॉ. राम सोलंकर आदींसह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी व विविध क्षेत्रातील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. O आ. बसवराज पाटील म्हणाले की, समाजातील प्रत्येक घटकाला शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे हे आमचे ध्येय आहे. शेती हा मुख्य व्यवसाय असलेल्या बळीराजासाठी मुख्यमंत्री पाणंद मुक्त योजनेच्या माध्यमातून सर्व रस्ते मजबुतीकरणाचा निर्णय घेण्यात आला असून, मराठवाड्यात सर्वात जास्त पाणंद रस्त्यांची कामे आपल्या उमरगा तालुक्यात झाली आहेत.आपला तालुका एक 'मॉडेल तालुका' म्हणून ओळखला जावा, यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. पुढे बोलताना त्यांनी, जागतिक बँकेचे कर्ज आणून उमरगा येथे उभारलेल्या १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाचा कोरोना काळात झालेला फायदा अधोरेखित केला. तसेच, हे रुग्णालय २०० खाटांचे करून महिलांसाठी स्वतंत्र रुग्णालय उभारण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासनही त्यांनी दिले. या शिबिरात लातूर, सोलापूर, धाराशिव आणि उमरगा येथील नामवंत व तज्ज्ञ डॉक्टरांनी विविध आजारांनी ग्रस्त रुग्णांची तपासणी केली. मोफत आरोग्य तपासणी व उपचार यामध्ये कॅन्सर, हृदयरोग, मधुमेह, स्त्रीरोग, बालरोग, नेत्र, तसेच कान, नाक, घसा यांसारख्या आजारांवरील ९,५८५ रुग्णांची मोफत तपासणी करून औषधोपचार करण्यात आले. या महारक्तदान शिबिरात १०१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. ३५६ जणांच्या रक्त तपासणीत ३५ जणांना मधुमेह (शुगर) असल्याचे निष्पन्न झाले. १२० लाभार्थ्यांचे आयुष्यमान भारत कार्ड काढण्यात आले. ५५ जणांचे छातीचे एक्सरे काढण्यात आले असून, त्यापैकी ७ जण टीबी संशयित आढळले. १० जणांची दिव्यांग तपासणी करून युडीआयडी कार्ड काढण्यात आले.O कार्यक्रमाचे संयोजक शरण पाटील यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेल्या दोन लाखांपर्यंतच्या शेतकरी कर्जमाफीच्या ऐतिहासिक निर्णयाचे स्वागत करत त्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमादरम्यान उपस्थित ५ पात्र लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांच्या लाभ वितरणाचे आदेश सुपूर्द करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपविभागीय अधिकारी दत्तु शेवाळे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सुभाष हुलपल्ले तर आभार तहसीलदार गोविंद येरमे यांनी मानले. तालुक्यातील विविध गावांमधून आलेल्या हजारो नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला.

## भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन




**दौलताबाद (जावेद अहेमद)** : माळीवाडा प्रीमियर लीग टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेच्या १२ वे पर्व चे उद्घाटन पंचायत समिती सदस्य सर्जेराव चव्हाण व निरीक्षक निरीक्षक नितीन खंडागळे यांच्या हस्ते करण्यात आले. सदर स्पर्धेचे प्रथम पारितोषिक २५५५५ असून द्वितीय ११११११ रुपये ठेवण्यात आले आहे तसेच प्रोत्साहन पर बक्षिसे देण्यात येणार आहे.सदर स्पर्धेमध्ये पंच क्रोषीतील जवळपास २० संघ भाग घेत आहे. यावेळी मा.उपसरपंच कडू कीर्तीकर, ग्रामपंचायत सदस्य धम्माल गायकवाड,प्रवीण बर्डे,सुधाकर हेकडे,कृष्णा मुळे, मनेश गाजरे,नंदकुमार मुळे,प्रमोद साठे,भाजप चे शेख बने व कल्याण काजूने, रामा गुजाळ,रामू सुरसे,शेख एजाज,नूर मिस्तरी, नितीन वानखेडे, गणेश अस्वार, नदू मुळे, प्रविण बर्डे, शिवाजी मुळे, छबू पेहरकर,सोमनाथ भगत, सुनिल मुळे, सुरेंद्र जगधने,रमेश आस्वार दत्तू जाधव दादासाहेब साठे यांच्यासह माळीवाडा ग्रामपंचायत सदस्य क्रिकेट प्रेमी मोठ्या संखेने उपस्थित होते

## शाळेच्या ग्रंथालयासाठी कृष्णकांत दुधाटे यांची ५० पुस्तकांची अनमोल भेट

**पूर्णा** : अभिनव विद्या विहार प्राथमिक शाळा पूर्णा येथील विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी, त्यांचे ज्ञानविश्व व्यापक व्हावे आणि शाळेतील वाचनसंस्कृती अधिक समृद्ध व्हावी, या उद्देशाने श्री. कृष्णकांत दुधाटे सरांनी शाळेच्या ग्रंथालयासाठी तब्बल ५० अमूल्य पुस्तके भेट दिली.दुधाटे सरांनी दिलेली ही पुस्तके शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष आदरणीय आनंदजी अजमेरा यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना विविध विषयांवरील दर्जेदार पुस्तके वाचण्याची संधी उपलब्ध होणार आहे.यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. रणवीर सर, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. रेड्डी मॅडम, पर्यवेक्षक श्री. सूर्यवंशी सर, श्री. सोनटक्के सर, श्री. विठ्ठल अनमुलवाड तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.श्री. कृष्णकांत दुधाटे सरांच्या या पुस्तकप्रेमी आणि शैक्षणिक योगदानाचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले. 'पुस्तक हेच खरे ज्ञानाचे भांडार' या भावनेतून दिलेली ही पुस्तक भेट विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठीही उपयुक्त ठरणार आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अँड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिंग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिंग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103



प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राधान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनीवार २५ जुलै २०२६


## एनसीसी विभागाच्या यशाची परंपरा कायम



**मुरुम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा येथील एनसीसी विभागाचा निकाल जाहिर झाला.शैक्षणिक वर्ष 2025-26 मध्ये बी आणि सी प्रमाणपत्र परीक्षा 53 महाराष्ट्र बटालियन लातूर यांच्या अंतर्गत घेण्यात आली यामध्ये बी प्रमाणपत्राच्या परीक्षेमध्ये एकुण 20 मुले आणि मुली उतीर्ण व सी प्रमाणपत्र परीक्षेत 03 कॅडेटस उतीर्ण झाले प्रत्येक वर्षा प्रमाणे एनसीसी विभागाने ही यशाची परंपरा कायम राखली.यावेळी

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय अस्वले सरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन कॅडेटसचा गौरव करण्यात आला.या प्रसंगी कॅडेटसना मार्गदर्शन करताना त्यांनी कॅडेटसना पोलीस,सैन्यदलात भरती झाल्यानंतर देशसेवा, समाजसेवा करावीच पण एक सामाजिक बांधिलकी म्हणून सर्वांना सोबत घेऊन ग्रामीण भागातील

तळागाळातील,गरीब,पीडित, वंचित विद्यार्थ्यांना एनसीसी चे उद्देश,महत्व सांगावे जेणेकरून यापुढेही एनसीसी विभागाचे , महाविद्यालयाचे नाव लौकिक वाढेल असे आव्हान त्यांनी केले.या कार्यक्रमास मंचावर डॉ पद्माकर पिटले,कॅप्टन डॉ ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले, डॉ चंद्रसेन करे, डॉ राम जाधव सर्व प्राध्यापक,प्राध्यापिका शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.या यशा बदल भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री अमोल मोरे उपाध्यक्ष श्री अश्लेष मोरे सर्व संचालक मंडळ यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## विशेष ग्रामसभेतून स्व इच्छेने पुनर्वसनासाठी पुढे येणाऱ्या कुटुंबांची इत्यंभूत माहिती गोळा करा - जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

**बीड (भगवंत पाळवदे ) :** कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पांतर्गत आष्टी तालुक्यातील खुंटेफळ साठवण तलावामुळे बाधित होणाऱ्या गावांच्या पुनर्वसनाला आता गती देण्यात येत आहे. भुमि संपादन आणि पुनर्वसन कायद्यातील (2013) कलम 108 नुसार प्रकल्पग्रस्तांना वाजवी भरपाई आणि सर्व आवश्यक सुविधा दिल्या जाणार आहेत. तरी संबंधित गटविकास अधिकाऱ्यांनी पुढाकार घेत गावच्या सरपंचांनी विशेष ग्रामसभा आयोजित करुन स्वइच्छेने पुनर्वसनासाठी पुढे येणाऱ्या कुटुंबांची इत्यंभूत माहिती गोळा करावी, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले आहेत. आष्टी तालुक्यातील उपसा सिंचन योजना क्र. 3 मधील खुंटेफळ साठवण तलाव बाधित मौजे खुंटेफळ व कुंबेफळ येथील पुनर्वसन आणि पुनर्स्थापना योजनेच्या प्रारुप अहवालाचे पुनर्वलोकन (कलम 17 (1) अन्वये) करण्यासाठी आयोजित केलेल्या जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रगती सभागृहातील बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस आमदार सुरेश धस, उपजिल्हाधिकारी शैलेश सुर्यवंशी, उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे यांच्यासह संबंधित विभागांचे प्रमुख आणि बाधित गावांचे सरपंच, माजी सरपंच यावेळी उपस्थित होते. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले की, महाराष्ट्रातील एकुण कृष्णा खोऱ्याच्या क्षेत्राच्या तुलनेत धाराशिव व बीड या मराठवाड्यामधील जिल्ह्यातील कृष्णा खोऱ्यातील क्षेत्र हे सर्व साधारण 8.39 टक्के इतके आहे. कृष्णा मराठवाडा प्रकल्पाचे बांधकाम 2 टप्प्यात करण्याचे नियोजित आहे. प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या प्रथम टप्प्याच्या मान्यतेनूसार खुंटेफळ साठवण तलावाची साठवण क्षमता 1.68 टीएमसी/ 47.57 द.ल.घ.मी. इतकी आहे. पर्यावरण मान्यतेनूसार खुंटेफळ साठवण तलावाचे काम हाती घेण्यात आले असून सद्यस्थितीत एकुण 58 लक्ष घनमीटर मातीकामापैकी 40.60 लक्ष घनमीटर म्हणजे 70 टक्के काम पुर्ण झालेले आहे. माती धरणाची उर्वरीत कामे व सांडव्याची कामे प्रगतीपथावर असून मार्च 2027 पर्यंत भूसंपादनाची प्रक्रिया पुर्ण करुन सदर साठवण तलावाची घळभरणी करण्याचे नियोजित आहे. असेही त्यांनी यावेळी सांगितले. आमदार सुरेश धस यांनी प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी पुढाकार घेतला. त्यांनी आष्टी तालुक्यातील मौजे खुंटेफळ (पुं) व मौजे कुंबेफळ या दोन्ही गावातील कुटुंबे, लोकसंख्या, रोजगार, शेती आणि ग्रामस्थांच्या अडीअडचणींची आदिची सविस्तर मांडली केली. गावकऱ्यांच्या हिताचा विचार करून, प्रत्येक कुटुंबाची लोकसंख्येनुसार अचुक माहिती गोळा करण्यास त्यांनी सहमती दर्शविली. या बैठकीमुळे या दोन्ही गावांचा पुनर्वसनाचा प्रश्न आता वेगाने आणि नियोजित पद्धतीने सुटण्यास मोठी मदत होईल, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली. बुडीत क्षेत्रात बाधित होणाऱ्या आष्टी तालुक्यातील मौजे खुंटेफळ पुंडी, कुंबेफळ, बाळेवाडी व सोलापूरवाडी व पुंडी या एकुण 5 गावापैकी मौजे खुंटेफळ पुंडी व मौजे कुंबेफळ या दोन गावांचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे. मौजे खुंटेफळ पुंडी या गावची लोकसंख्या 1230 असून बाधित किंवा विस्थापित होणाऱ्या कुंटुंबाची संख्या 612 अशी आहे. तर मौजे कुंबेफळ या गावची लोकसंख्या 1049 असून बाधित किंवा विस्थापित होणाऱ्या कुंटुंबाची संख्या 437 अशी आहे. तर मौजे खुंटेफळ पुंडी या गावात अनुसूचित जाती व जमातीची लोकसंख्या 108 असून बाधित किंवा विस्थापित होणाऱ्या कुंटुंबाची संख्या 62 अशी आहे. तसेच मौजे कुंबेफळ या गावात अनुसूचित जाती व जमातीची लोकसंख्या 136 असून बाधित किंवा विस्थापित होणाऱ्या कुंटुंबाची संख्या 70 अशी आहे. पुनर्वसन व पुनर्स्थापना प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी पाटोदा यांच्यामार्फत बाधित क्षेत्रात आवश्यक सर्वेक्षण करण्यात आले आहे. प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाकरिता आष्टी तालुक्यातील मौजे कुंबेफळ येथील गायरान जमीन गट नं 60 येथील क्षेत्र 32.02 हे. आर जमिनीची निवड करण्यात आली आहे. तर मौजे खुंटेफळसाठी मौजे वाहिरा येथील जमीन गट नं 43, 47 येथील क्षेत्र 44.00 हे. आर. व मौजे सोलापूरवाडी येथील जमीन गट नं. 10 क्षेत्र 44.00 हे. आर. जमिनीची स्थळ पाहणी, जागा निश्चिती समितीमार्फत प्रस्तावित आहे. तसेच नगर रचना विभागाकडून मान्यताप्राप्त लेआउटनुसार आणि स्वेच्छा पुनर्वसनाच्या कार्यवाहीस अधीन राहून प्रकल्पग्रस्तांना भूखंड वाटप केले जातील. तसेच सर्व नागरी सुविधा पुरवून मे 2028 पर्यंत पुनर्वसनाची संपूर्ण कार्यवाही पूर्ण करण्याचे प्रशासनाने ठरविले आहे







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनीवार २५ जुलै २०२६







# चाळीस वर्षांनंतर पुन्हा भरला वर्ग; श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात आठवणींचा भावस्पर्शी मेळावा



**मुरुम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** काळ पुढे सरकत राहतो, आयुष्याच्या वाटा बदलत जातात; मात्र विद्यार्थी जीवनातील आठवणींची पाऊलखूण कधीही पुसली जात नाही. अशाच अविस्मरणीय आठवणींना उजाळा देणारा भावस्पर्शी क्षण भारत शिक्षण संस्था, उमरगा संचलित श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात अनुभवायला मिळाला. महाविद्यालयाच्या 1986 च्या पॉलिटेक्निक बॅचचे माजी विद्यार्थी तब्बल चाळीस वर्षांनंतर पुन्हा आपल्या ज्ञानमंदिरात एकत्र आले आणि संपूर्ण परिसर आठवणींच्या सुगंधाने भारावून गेला.आंध्रप्रदेश आणि तेलंगणा राज्यातून खास या भेटीसाठी आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या वर्गखोल्या, वसतिगृह, खेळाचे मैदान आणि कॅम्पसचा फेरफटका मारत आपल्या तारुण्याच्या दिवसांना पुन्हा एकदा जणू स्पर्श केला. प्रत्येक कोपरा, प्रत्येक पायरी आणि प्रत्येक वर्ग व्हॉलीबॉल ग्राउंड त्यांच्यासाठी आठवणींचा खजिना ठरला. चार दशकांनंतर पुन्हा भेटलेल्या वर्गमित्रांच्या चेहऱ्यावरील आनंद, डोळ्यांतील ओलावा आणि मनातील आपुलकी पाहून वातावरण भावनांनी भारावून गेले.या प्रसंगी माजी विद्यार्थ्यांनी भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. अमोल शिवाजीराव मोरे यांची सदिच्छा भेट घेतली. त्यांनी संस्थेचे तत्कालीन अध्यक्ष स्व. कर्मयोगी श्रीधरराव मोरे (अण्णा) यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाला आणि संस्थेने दिलेल्या संस्कारमय शिक्षणाला कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले.भावनांना वाट मोकळी करून देताना माजी विद्यार्थ्यांनी सांगितले, "आम्ही आंध्रप्रदेशमधून उमरग्यात शिक्षणासाठी आलो. तीन वर्षे वसतिगृहात राहिलो. येथील शिस्त, शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन, संस्थेचे संस्कार आणि मिळालेल्या संधी यामुळेच आज आम्ही जीवनात यशस्वी झालो. आमच्या मुलांना उच्च शिक्षण देऊ शकलो आणि नातवंडांसाठीही प्रेरणादायी वारसा निर्माण करू शकलो. या सर्व यशाचे श्रेय या महाविद्यालयालाच जाते."महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी सर्व माजी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यांनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक, संशोधन आणि गुणवत्ताविषयक प्रगतीची माहिती देत माजी विद्यार्थ्यांनी संस्थेशी कायम ऋणानुबंध जपावेत आणि भावी पिढ्यांच्या विकासासाठी योगदान द्यावे, असे आवाहन केले.या भेटीत उमरग्यातील आर. टी. ओ. जाधव, प्रदीप वाघ, राजेंद्र पतगे, राजू सूर्यवंशी यांच्यासह अनेक जुन्या सहाध्यायांच्या आठवणी जाग्या झाल्या. एम. शिवकुमार, के. रघू रामय्या, बी. वेणुगोपाल, टी. हर्षवर्धन, ए. श्रीधर आणि पी. जितेंद्र रेड्डी यांनी महाविद्यालयीन जीवनातील संस्मरणीय प्रसंग सांगताना त्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा एकदा चाळीस वर्षांपूर्वीच्या विद्यार्थीदशेचे निरागस हास्य खुलले होते.ही भेट केवळ माजी विद्यार्थ्यांचा मेळावा नव्हती; ती होती संस्कार, कृतज्ञता आणि ऋणानुबंधांचा उत्सव. शिक्षणसंस्थेने घडविलेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय पुन्हा एकदा आपल्या मातृसंस्थेला अर्पण करत, "विद्यार्थी महाविद्यालय सोडतो; पण महाविद्यालय विद्यार्थ्याला कधीच सोडत नाही," या भावनेची जिवंत प्रचिती या अविस्मरणीय भेटीतून सर्वांना अनुभवायला मिळाली.

# कालिकादेवी विद्यालयाचा पायी दिंडी सोहळा संपन्न



**(शिरूर कासार) :** देवशयनी 'आषाढी एकादशी' निमित्त कालिकादेवी विद्यालयाचे, प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालया-तील सर्व मुलांनी छोटे वारकरी होऊन, संत ज्ञानोबा माऊली आणि संत नामदेव-तुकोबां महाराजांच्या नावाने गजर करत 'पायी दिंडी' काढली.थोरां-मोठ्यां बरोबरच लहान बाळ-गोपाळांची ही 'पायी दिंडी' विद्यालयापासून मार्गस्थ झाली.पुढे शिरूर नगरपंचायत-जुने पोलीस ठाणे-मेन रोड मार्गे शहरातील बाजारतळ ते श्री क्षेत्र सिद्धेश्वर संस्थान,शिरूर कासार येथे पोहोंचली.तिथे सर्वांनी श्री सिद्धेश्वर महाराजांच्या समाधीचे दर्शन घेऊन,पुढे मार्गस्थ झाली.वाटेत संतांचे भक्तीमय अभंग सादर करीत,संत एकनाथ महाराजांचे भारुडे,गवळणी गात-गात आणि फुगडी खेळांचा फेर धरुन,टाळ मृदंगाच्या गजरात बा विठ्ठलाची आळवणी केली.या पायी दिंडी सोहळयाच्या माध्यमातून छोट्या वारकरी मुलांनी शिरूर वासियांना जात-पात,ऊंच-नीच असा भेदभाव न मानता समता, बंधुता आणि एकात्मतेचा संदेश दिला. पुढे ही पायी दिंडी विद्यालयात विसर्जित करण्यात आली. याप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक सर्व प्राध्यापक, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यालयातील सर्व विद्यार्थी यांनी उस्फूर्त सहभाग घेतला होता.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com


छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनीवार २५ जुलै २०२६


## ज्ञानेश्वर विद्यालयात आषाढी एकादशीनिमित्त 'खाम नदी प्रदूषणमुक्ती'चा जागर; वारकरी वेशभूषेत विद्यार्थ्यांची जनजागृती दिंडी




**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील खाम नदी पुनर्जीवन अभियानांतर्गत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आणि बेगमपुरा येथील ज्ञानेश्वर विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी एकादशीचे औचित्य साधून भव्य स्वच्छता व जनजागृती दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषा परिधान करून आणि पालखी सजवून संपूर्ण बेगमपुरा परिसरात शिस्तबद्ध प्रभातफेरी काढत नागरिकांना खाम नदी स्वच्छ व सुंदर ठेवण्याबाबत प्रबोधन केले.मनपा आयुक्त श्री. अमोल येडगे आणि उपायुक्त श्री. नंदकिशोर भोंबे यांच्या आदेशानुसार तसेच सहाय्यक आयुक्त पुजारी मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ. संध्या मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पर्यवेक्षक संभाजी तांगडे यांच्या उत्तम नियोजनातून या दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.*पर्यावरण आणि स्वच्छतेचा दिला प्रभावी संदेश*दिंडीदरम्यान विद्यार्थ्यांनी "खाम नदीमध्ये कोणत्याही प्रकारचा कचरा टाकू नका", "ओला व सुका कचरा वेगळा करा", "कचरा सार्वजनिक ठिकाणी किंवा नाल्यात टाकू नका" आणि "प्लास्टिकचा वापर टाळा" अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला. यासोबतच, शाळेतील आयुर्वेदिक नर्सरीचा (परसबाग) विशेष संदर्भ देत विद्यार्थ्यांनी नागरिकांना वृक्षसंवर्धन, पर्यावरण संरक्षण आणि घनकचरा व्यवस्थापनाचे महत्त्व अतिशय सोप्या भाषेत समजावून सांगितले.*व्यावसायिकांना कचरा वर्गीकरणाचे आवाहन*ही जनजागृती रॅली तळेश्वर कॉलनी, चारमिनार हॉटेल ते थत्ते हौद, ब्राह्मण गल्ली, कुंभार गल्ली, विद्युत कॉलनी व चावडी गल्ली परिसरातून मार्गस्थ झाली. या दरम्यान IEC टीमच्या माध्यमातून परिसरातील हॉटेल व्यावसायिक, नाश्ता सेंटर, पानटपरी आणि भाजीपाला विक्रेत्यांना ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे संकलित करण्यासाठी प्रत्येकी दोन डस्टबिन सक्तीने ठेवण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच दुकानासमोर कचरा न टाकण्याबाबत आणि प्लास्टिक बंदीच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. खाम नदी स्वच्छ व प्रदूषणमुक्त ठेवण्याच्या उद्देशाने राबवण्यात आलेली ही मोहीम लक्षवेधी ठरली.*मान्यवरांची उपस्थिती*या मोहिमेत मनपाचे स्वच्छता निरीक्षक आशिष शिंदे, जवान राजू येद्रा, प्रभाग इन्चार्ज अभिजीत गंगावणे, इकोसत्वचे सह-समन्वयक रवी जगताप व धीरज राजपूत, सुपरवायझर अक्षय दाभाडे, IEC प्रभाग इन्चार्ज नितीन जोगदंड, किरण पवार, आनंद श्रीसुंदर आणि विकी साबळे यांनी विशेष सहभाग नोंदवला.याप्रसंगी ज्ञानेश्वर विद्यालयाचे पर्यवेक्षक संभाजी तांगडे यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लोकमान्य टिळक यांची जयंती साजरी




**गुंजोटी (प्रा. नागसेन कांबळे) :** येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात सांस्कृतिक विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने लोकमान्य टिळक यांची जयंती साजरी करण्यात. भारतीय असंतोषाचे जनक म्हणून टिळकांना ओळखले जाते.भारतीय स्वातंत्र्यलढ्यात लोकमान्य टिळकांचे योगदान अमूल्य आहे.भारतीय स्वातंत्र्यलढा अधिक तीव्र करण्यासाठी टिळकांनी जी चतुसूत्री मांडली ती अत्यंत प्रभावी व दूरगामी परिणाम करणारी होती.अगोदर स्वातंत्र्य की सामाजिक सुधारणा या वैचारिक चक्रव्युहात अनेकदा टिळकांच्या राजकीय भूमिकांचे अयोग्य मूल्यमापन होऊन अनेकदा त्यांच्यावर अन्याय केला जातो पण त्याची स्वातंत्र्यलढ्याविषयी सामग्र्याने भूमिका समजून घेतली तर त्यांच्या वैचारिक परिपक्वतेचे दर्शन आपल्याला घडते,असे सांगून या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा.डॉ.राजाराम निगडे यांनी टिळक अस्त ते गांधीयुगापर्यंतचा प्रवास आपल्या छोटेखानी भाषणात मांडला यावेळी व्यासपीठावर डॉ.अनिल काळदाते,प्रा.एन.जे पवार तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुलाब राठोड उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आरंभी लोकमान्य टिळक यांच्या यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केल्यानंतर प्रा. डॉ. आर. एन. निगडे यांनी लोकमान्य टिळकांच्या विविध राजकीय पैलूंवर प्रकाश टाकत लोकमान्य टिळकांच्या व्यक्तिमत्वाचे अंतरंग उलगडून दाखवले.यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

DMLT कालावधी २ वर्ष पात्रता : १० वी /१२ वी पास

SANITARY HEALTH INSPECTOR कालावधी १ वर्ष पात्रता : १०वी /१२ वी पास

PG RADIOLOGY कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर) पात्रता : Any B.Sc.

C.T.SCAN कालावधी १ वर्ष पात्रता : १० वी १२ वी पास

E.C.G. कालावधी १ वर्ष पात्रता : १० वी १२ वी पास

PGDMLT कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर) पात्रता : B.Sc (Microbiology, chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY कालावधी १ वर्ष पात्रता : १०वी, १२ वी पास

रेडिओलॉजी कालावधी २ वर्ष पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी कालावधी २ वर्ष पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री कालावधी २ वर्ष पात्रता : १२ वी सायन्स पास

DIALYSIS TECHNICIAN कालावधी १ वर्ष पात्रता : १० वी / १२ वी पास

O.T.TECHINICIAN कालावधी २ वर्ष पात्रता : १० वी १२ वी पास

ADMISSION OPEN

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903



मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.

मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनीवार २५ जुलै २०२६

# आषाढी निमित्त माऊली सेमी आणि इंग्लिश स्कूल मध्ये माऊली व विठ्ठल रूक्मिणी दिंडी सोहळा उत्साहात संपन्न



**बीड /अंबाजोगाई (भगवंत पाळवदे)** अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापूर येथील माऊली न्यू मॉडर्न इंग्लिश स्कूल व माऊली प्राथमिक व माध्यमिक विद्यालय बर्दापूर येथे आषाढीनिमित्त दिंडी उत्साहात साजरी करण्यात आली यामध्ये विद्यार्थ्यांनी विविध वेशभूषा परिधान केल्या होत्या संत तुकाराम, संत एकनाथ ,चोखामेळा, वेदिका, मीराबाई, मुक्ताबाई कान्होपात्रा, वासुदेव, इंजिनिअर, डॉक्टर, देशभक्त इत्यादीच्या माध्यमातून जनतेला संदेश देण्यात आला की विठ्ठल हा संताच्या रूपात आहे, डॉक्टरच्या रूपात आहे, देशभक्त या रूपात आहे माऊली व विठ्ठल रुक्माई यांची पूजा ही माऊली न्यू माऊली प्राथमिक व माध्यमिक विद्यालय बर्दापूर चे मुख्याध्यापक श्री मोरे सर यांच्या हस्ते करण्यात आली व पूर्ण संपूर्ण गावभर दिंडी ही फिरवण्यात आली आषाढीनिमित्त विविध नृत्य सादर करण्यात आले. लेझीम घेण्यात आली. टाळ मृदंगाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी विविध अभंगे विठ्ठलाची गीते गायन केले. दिंडीमध्ये पताके विद्यार्थ्यांनी हातात घेतले ,संदेशाचे फलक विद्यार्थ्यांनी हातात घेतली १)हाती घेऊन दिंडी पताका शिक्षणाचा २)आमची वारी स्वच्छतेची वारी ३) दिंडीतून संस्कृतीची ओळख विद्यार्थ्यांचा अभिमान ४)विद्यार्थ्यांच्या पावलांनी भक्तीचा संदेश घरोघरी ५)शाळेचा संकल्प -संस्कार शिस्त आणि सेवा ६) विठ्ठल- विठ्ठल जय हरी आमची निघाली मुलांची वारी ७)ज्ञान, संस्कार आणि भक्ती हाच आमचा शाळेचा खरा वारसा ८)सुंदर हस्ताक्षर ,स्वच्छ शाळा, विठुरायाच्या भक्तीचा लळा ९)वारी विठ्ठलाची ओळख महाराष्ट्राची, वारकऱ्यांची चरणसेवा, शाळा आमची वाट प्रगतीची. विद्यार्थ्यांनी फुगडीचा आनंद घेतला. नृत्य नृत्याची कोरिओग्राफी शिंगारे उषा मॅम यांनी केली तर लेझीमची कोरिओग्राफी पवार दिलीप सर यांनी केले. दिंडी सोहळा उत्साहात संपन्न होण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षकांनी व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले

## आषाढी एकादशी

मृदुंगाचा निनाद
टाळ चिपळ्या संगे
किर्तनाच्या भक्तीरसात
वारकरी रंगे

विठ्ठलाच्या भेटीची
ओढ लागली मनी
रिंगण सोहळ्यात
होती आनंदाचे धनी

भाळी चंदणाचा टिळा
तुळशी माळ गळा
आषाढी एकादशीला पंढरी
फुले भक्तीचा मळा

हरी किर्तनाचा सोहळा
चंद्रभागेच्या तीरी
आषाढी एकादशी
वाटे एकतेची वारी

सावळे सुंदर रूप
ठेवूनिया कर कटेवरी
पाहे विठू सोहळा
उभा राहूनी विटेवरी



**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**

# विषयाचे सखोल ज्ञान, विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहचतो आणि प्रेम व शिस्त लावतो, तोच उत्तम शिक्षक

उत्तम शिक्षक म्हणजे कोण, याबद्दल आपल्या समाजात अनेक समज-गैरसमज आढळतात. काहींना वाटते की एखाद्या विषयात प्रचंड प्राविण्य मिळवलेला माणूस आपोआप उत्तम शिक्षक बनतो. काहींना वाटते की विद्यार्थ्यांवर भरभरून प्रेम करणारा शिक्षकच आदर्श असतो, तर काहींच्या मते कडक शिस्त लावणारा शिक्षकच विद्यार्थ्यांना घडवू शकतो. प्रत्यक्षात मात्र या तिन्ही समजुती अपुऱ्या आहेत.सर्वप्रथम, एखाद्या विषयात प्राविण्य मिळवणे आणि ते ज्ञान इतरांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवणे या दोन पूर्णपणे भिन्न क्षमता आहेत. तरीही आपण असा समज करून घेतो की एखादी व्यक्ती एखाद्या क्षेत्रात अव्वल असेल, तर ती उत्तम शिक्षक, प्रशिक्षक किंवा मार्गदर्शकही असणार. परंतु वास्तवात तसे अपवादानेच घडते.उदाहरणार्थ, जागतिक दर्जाचा खेळाडू हा उत्कृष्ट प्रशिक्षक असेलच असे नाही. अनेक महान खेळाडूंना आपल्या कौशल्याचे इतरांमध्ये रूपांतर करता येत नाही. याउलट, स्वतः फार मोठा खेळाडू नसलेले प्रशिक्षक अनेक विश्वविजेते खेळाडू घडवतात. हेच विज्ञान, संगीत, व्यवसाय, कला आणि इतर सर्व क्षेत्रांनाही लागू होते. याचमुळे एखादा वैज्ञानिक जगातील सर्वोच्च संशोधक असू शकतो; पण विद्यार्थ्यांना शिकवताना तो अपयशी ठरू शकतो. याउलट, एखादा शिक्षक विज्ञान तत्सम विषयातील संशोधक नसला तरी तो अवघड संकल्पना इतक्या सहजपणे समजावून सांगतो की त्या विद्यार्थ्यांच्या मनात कायमच्या कोरल्या जातात.म्हणजेच, एखाद्या विषयात प्राविण्य मिळवण्यासाठी सखोल अभ्यास, विश्लेषण, संशोधन आणि सातत्यपूर्ण सराव आवश्यक असतो. परंतु प्रभावी अध्यापनासाठी मात्र विद्यार्थ्यांची बौद्धिक पातळी ओळखणे, योग्य उदाहरणे निवडणे, गुंतागुंतीच्या संकल्पना सोप्या करून सांगणे, संवाद साधणे आणि विद्यार्थ्यांची नेमकी अडचण समजून घेण्याची क्षमता आवश्यक असते.पण एवढ्यावरच उत्तम शिक्षक घडत नाही. ज्ञान कितीही उत्तम पद्धतीने मांडले, तरी वर्गात योग्य वातावरण नसेल तर त्याचा अपेक्षित परिणाम होत नाही. त्यामुळे शिक्षकाचा स्वभाव आणि विद्यार्थ्यांशी असलेले त्याचे नातेही तेवढेच महत्त्वाचे ठरते. यास्तव शिक्षकाने प्रेमळ आणि शिस्तप्रिय या दोन्ही गुणांचा समतोल राखणे आवश्यक असते. अतिशय कडक शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये भीती निर्माण करतो; पण भीतीतून निर्माण होणारी शिस्त बहुधा तात्पुरती असते. परिणामी शिक्षक समोर असेपर्यंतच असे विद्यार्थी नियम पाळतात. साहजिकच अशा वातावरणात मग विद्यार्थी विषय समजून घेण्यापेक्षा शिक्षा टाळण्याचा अधिक प्रयत्न करतात.दुसरीकडे, केवळ प्रेमळ स्वभाव असून नियमांची अंमलबजावणी न करणारा शिक्षक विद्यार्थ्यांचा आवडता असू शकतो; पण वर्गातील शिस्त हळूहळू ढासळते. काही विद्यार्थी त्याच्या चांगुलपणाचाच गैरफायदा घेतात. परिणामी, शिकण्यापेक्षा गोंधळालाच अधिक वाव मिळतो.. म्हणूनच सुजाण शिक्षक या दोन्ही टोकांपासून दूर राहतो. तो विद्यार्थ्यांवर प्रेम करतो; पण त्यांच्या प्रत्येक चुकीकडे दुर्लक्ष करत नाही. तो शिस्त पाळायला लावतो; पण त्यामागे सूड, राग किंवा अपमान नसतो. त्याचा उद्देश विद्यार्थ्याला घाबरवणे नसून घडवणे असतो.मानसशास्त्रात याला Authoritative Teaching किंवा Authoritative Parenting या तत्त्वाशी साधर्म्य असलेला दृष्टिकोन मानला जातो. यात प्रेम, संवाद, अपेक्षा आणि शिस्त यांचा समतोल राखला जातो. अनेक संशोधनांमध्ये हा दृष्टिकोन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती, आत्मविश्वास आणि आत्मशिस्तीसाठी सर्वाधिक परिणामकारक आढळला आहे.थोडक्यात, उत्तम शिक्षक हा केवळ विद्वान नसतो, केवळ उत्कृष्ट वक्ताही नसतो आणि केवळ प्रेमळ किंवा कडकही नसतो. विषयाचे सखोल ज्ञान, ते प्रभावीपणे शिकवण्याचे कौशल्य आणि प्रेम व शिस्त यांचा योग्य समतोल या तिन्ही गुणांचा संगम ज्याच्यात असतो, तोच शिक्षक विद्यार्थ्यांच्या मनावर आणि आयुष्यावर चिरस्थायी प्रभाव टाकतो !



**- प्रा डॉ राजेंद्र सोनवणे**
**जे ई एस महाविद्यालय.**
**जालना.**

MAHARASHTRA JANSHAKTI NEWS.COM
MAHARASHTRA JANSHAKTI
MJ NEWS

प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनीवार २५ जुलै २०२६


# तालुक्यातून सहा प्रमुख दिंड्यांचा सहभाग, वारकरी संप्रदायाचा मोठा वारसा



आषाढ महिना सुरू झाला की कन्नड तालुक्यातील वातावरणच बदलून जाते. शेतात पेरणीची लगबग असते, आकाशात पावसाचे ढग दाटून येतात आणि माणसांच्या मनात मात्र एकच ओढ लागते ती म्हणजे पंढरपूरच्या विठ्ठलाला डोळे भरून पाहण्याची. या ओढीला वारी म्हणतात. ही वारी म्हणजे केवळ एक धार्मिक यात्रा नाही तर ती महाराष्ट्राच्या संस्कृतीचा श्वास आहे. शेकडो वर्षांपासून संतांनी घालून दिलेल्या वाटेवर आजही लाखो लोक तितक्याच श्रद्धेने चालत आहेत.कन्नड तालुक्याला वारकरी संप्रदायाचा मोठा वारसा लाभलेला आहे. गावोगावी वर्षभर होणारे अखंड हरिनाम सप्ताह आणि ठिकठिकाणी होणारे फिरते नारळी सप्ताह यामुळेच तालुक्यात वारकरी संप्रदायाचे मोठे प्रस्थ निर्माण झाले आहे. वासडी पंचक्रोशीत वै. ह. भ. प. नरहरी महाराज यांनी वारकरी संप्रदायाचा प्रचार प्रसार मोठ्या प्रमाणात केला. त्यांनीच फिरत्या नारळी सप्ताहाची परंपरा सुरू करून ती रूजवली. आजही हा सप्ताह दरवर्षी मोठ्या उत्साहाने साजरा होतो. कन्नड शहरात देखील दरवर्षी एक फिरता नारळी सप्ताह होतो. पिशोर, वाकी, चापानेर, हतनूर, मुंडवाडी ही गावे त्यांच्या सप्ताहांसाठी प्रसिद्ध आहेत. वाढदिवस असो किंवा इतर कोणताही सामाजिक कार्यक्रम, त्यात नामांकित कीर्तनकारांची कीर्तने ठेवण्याची परंपरा तालुक्यात आहे.याच भक्तिमय पार्श्वभूमीवर यंदा आषाढी एकादशीच्या निमित्ताने तालुक्यातून सहा प्रमुख पायी दिंड्या मोठ्या उत्साहाने मार्गस्थ झाल्या आहेत. वाकी येथील नारायण देव बाबा पालखी, चापानेर येथील वैजिनाथ बाबा पालखी, वासडी येथील नरहरी महाराज पालखी, मुंडवाडी येथील संत सेवालाल पालखी, देभेगाव येथील ढवळेश्वर पालखी आणि मेहेगाव येथील भगवान गडाची दिंडी या दिंड्यांसोबत हजारो वारकरी पंढरपूरच्या दिशेने निघाले आहेत. मेहेगाव येथील भगवान गडाची दिंडीही ह. भ. प. गणेशानंद शास्त्री महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहाने मार्गस्थ झाली आहे. डोक्यावर तुळशीचे वृंदावन, हातात भगव्या पताका आणि मुखात अखंड ज्ञानोबा तुकोबा चा जयघोष करत हे वारकरी पुढील दहा ते बारा दिवसांचा पायी प्रवास करणार आहेत.वाकी येथील नारायण देव बाबा पालखी ही तालुक्यातील सर्वात जुन्या दिंड्यांपैकी एक आहे. गेली अनेक वर्ष ही परंपरा अखंडितपणे सुरू आहे. या दिंडीचे वैशिष्ट्य म्हणजे यात मोठ्या संख्येने महिला वारकरी सहभागी होतात. चापानेर येथील वैजिनाथ बाबा पालखी ही शेतकरी वर्गाची दिंडी म्हणून ओळखली जाते. शेतातील पेरणीची कामे आटोपल्यानंतर शेतकरी कुटुंबे या दिंडीत सामील होतात. वासडी येथील नरहरी महाराज पालखी ही अध्यात्मिक परंपरा जपणारी दिंडी आहे. या दिंडीत अभंग, कीर्तन आणि प्रवचनाला विशेष महत्व दिले जाते. मुंडवाडी येथील संत सेवालाल पालखी ही सामाजिक ऐक्याचे प्रतीक आहे. या दिंडीत विविध समाजातील लोक एकत्र येऊन चालतात. देभेगाव येथील ढवळेश्वर पालखी ही तिच्या शिस्त आणि नियोजनासाठी प्रसिद्ध आहे. तर मेहेगाव येथील भगवान गडाची दिंडी गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात वाढली आहे. ह. भ. प. गणेशानंद शास्त्री महाराज यांच्या मार्गदर्शनामुळे या दिंडीला वेगळी ओळख मिळाली असून दरवर्षी येथे मोठा कीर्तन उत्सव देखील भरतो.तालुक्यात छोट्या मोठ्या अनेक वारकरी संस्था कार्यरत आहेत. वाकी येथील शिवेश्वर संस्थान हे त्यापैकी एक महत्वाचे केंद्र आहे. नव्या हतनूर येथील वारकरी संस्था आणि बहिरगाव शिवारातील विष्णू महाराज काळे यांची विश्वमाई संस्था तरुण विद्यार्थ्यांना संस्कारक्षम बनवण्याचे काम करीत आहेत. देभेगाव येथील ढवळेश्वर संस्थानातही दरवर्षी मोठा उत्सव साजरा होतो.शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातूनही वारकरी संप्रदायाला मोठे बळ मिळत आहे. कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयाने यात मोलाची भूमिका बजावली आहे. महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागातर्फे आणि प्राचार्य डॉ. विजय भोसले यांच्या पुढाकाराने संगीत व नाट्य शास्त्र विभाग सुरू आहे. सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. के. एल. भानुसे यांच्या प्रयत्नांमुळे येथून अनेक कीर्तनकार, प्रवचनकार, मृदंगाचार्य, गायक आणि भारुडकार घडले आहेत. त्यांनी युवक महोत्सवात लक्षणीय योगदान दिले आहे. इंडियन आयडॉल फेम राहुल खरे, ह. भ. प. रामेश्वर महाराज मगर, ह. भ. ज्ञानेश्वर महाराज भवर आणि संतोष पवार यांच्यासारखे कलावंत याच मातीतून घडले. संत पीठ पैठण येथे कार्यरत असणारे ह. भ. प. डॉ. राधाकृष्ण महाराज अकोलकर देखील तालुक्याचे नाव मोठे करत आहेत.मराठी विभाग प्रमुख डॉ. शिवाजी हुसे आणि डॉ. रामचंद्र झाडे हे संत साहित्याच्या प्रचार व प्रसारासाठी विशेष प्रयत्न करत आहेत. शिवाजी महाविद्यालयात मराठी विभागांतर्गत मराठी संशोधन केंद्र आणि संत तुकाराम अध्यासन केंद्र कार्यरत आहे. त्रैमासिक तिफण आणि संत तुकाराम अध्यासन केंद्रातर्फे संत बहिणाबाई व संत तुकाराम यांच्यावर चर्चासत्र घेऊन विशेषांक प्रकाशित करण्यात आले. तसेच त्रैमासिक तिफणने संत साहित्य विशेषांक, मध्ययुगीन साहित्य विशेषांक काढून संत साहित्याच्या जतन आणि प्रसारात मोलाचे योगदान दिले आहे. दरवर्षी येथे संतांवर चर्चासत्रे आणि व्याख्यानमाला आयोजित केल्या जातात. तुका म्हणे पुरस्कार देऊन संत साहित्याचा अभ्यास करणाऱ्यांना गौरवले जाते. कन्नड येथील एका महाविद्यालयाला तर थेट संत तुकाराम महाविद्यालय असे नावच देण्यात आले आहे. देवगाव रंगारी हे गाव संत बहिणाबाईंचे माहेर म्हणून ओळखले जाते. त्यामुळे संपूर्ण तालुक्यात संत साहित्य आणि वारकरी परंपरा यांचा प्रचार प्रसार होत आहे. आज अनेक विद्यार्थी संत साहित्यावर संशोधन करत आहेत.सामाजिक क्षेत्रातूनही या परंपरेला पाठबळ मिळत आहे. कन्नड येथील उद्योजक मा. मानसिंहजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहकार महर्षी बाळासाहेब पवार वाचनालयात गेली चार पाच वर्षे आषाढी महोत्सवानिमित्त विशेष कार्यक्रम संपन्न होत आहेत. यातून तालुक्यातील नागरिकांना संत साहित्य जवळून समजून घेता येते.वारी म्हणजे नेमके काय तर ती फक्त चालणे नाही. वारी म्हणजे मनाची शुद्धी आहे. आजच्या धावपळीच्या युगात दहा दिवस मोबाईल बाजूला ठेवून, निसर्गात राहून, लोकांशी बोलून माणूस स्वतःला पुन्हा शोधतो. वाटेत ऊन लागते, पाऊस येतो, पाय दुखतात. पण मुखात नाम असले की सर्व वेदना विसरल्या जातात. या वारीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे येथे कोणताही भेदभाव नाही. शेतकरी, शिक्षक, व्यापारी, मजूर सर्वजण वारकरी म्हणून एकत्र चालतात. एकमेकांना मदत करतात. रात्रीचा मुक्काम एकत्र होतो आणि जेवणही एकत्र होते. हीच खरी समता आहे आणि हेच संतांनी शिकवले तत्वज्ञान आहे.वाटेतील गावकरी देखील या वारीत मोठ्या उत्साहाने सहभागी होतात. ज्या ज्या गावातून या दिंड्या जातात त्या त्या गावातील लोक मोठ्या प्रेमाने त्यांचे स्वागत करतात. शाळा, मंदिरे मुक्कामासाठी दिली जातात. वारकऱ्यांसाठी पाणी, चहा आणि जेवणाची व्यवस्था केली जाते. प्रशासनाकडून देखील आरोग्य, पाणी आणि सुरक्षेची योग्य ती व्यवस्था केली जाते. अलीकडे महिला आणि तरुणांचा सहभाग वाढल्याने वारीला नवा जोश मिळाला आहे. पुढील काही दिवसात या सहाही दिंड्या पंढरपूरात पोहोचतील. चंद्रभागेच्या काठावर उभे राहून विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेतल्यावर त्यांची वर्षभराची आस पूर्ण होईल. पण वारी संपली तरी तिचा परिणाम संपत नाही. पंढरपूरहून परत आलेला वारकरी अधिक नम्र, अधिक मेहनती आणि अधिक माणुसकीने वागणारा होतो. एका वारीचा परिणाम पुढील तीनशे पासष्ट दिवस दिसतो.कन्नड तालुका हा केवळ भौगोलिकदृष्ट्या मोठा नाही तर सांस्कृतिकदृष्ट्या देखील समृद्ध आहे. अखंड हरिनाम सप्ताह, फिरते नारळी सप्ताह, कीर्तन उत्सव, संशोधन केंद्र, विशेषांक आणि वाचनालयाचे उपक्रम तसेच आता या सहा मोठ्या दिंड्या यामुळे तालुक्याची ओळख वारकरी भूमी म्हणून पक्की झाली आहे. देवगाव रंगारीसारखे संतांचे माहेर असलेले गाव आणि संत तुकारामांच्या नावाचे महाविद्यालय ही या भूमीची ओळख आहे.जोपर्यंत या मातीत भक्ती आहे, मुखात नाम आहे आणि मनात विठ्ठलाची ओढ आहे तोपर्यंत कन्नड तालुक्यातून पंढरीकडे जाणारा हा ओघ कधीच थांबणार नाही. ज्ञानोबा माऊली तुकाराम चा गजर घुमत राहील आणि वारीची ही परंपरा पिढ्यानुपिढ्या चालत राहील.


**डॉ. शिवाजी हुसे**
**प्रमुख, मराठी विभाग व संत तुकाराम अध्यासन केंद्रशिवाजी महाविद्यालय, कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर**








महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनीवार २५ जुलै २०२६

# स.भु.महाविद्यालयामध्ये करिअर कट्टा विभागाच्या नवनियुक्त मुख्यमंत्र्याचा सत्कार व एकदिवशीय कार्यशाळा संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आणि सरस्वती भुवन कला व वाणिज्य महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करिअर कट्टा विभागीय एकदिवसीय कार्यशाळा अत्यंत उत्साहपूर्ण व शिस्तबद्ध वातावरणात संपन्न झाली. या कार्यशाळेचे मुख्य उद्दिष्ट शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये करिअर कट्टा अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचे नियोजन, विभागीय व जिल्हास्तरीय समन्वय अधिक प्रभावी करणे, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नवीन उपक्रमांची आखणी करणे तसेच समन्वयकांना आवश्यक दिशा व मार्गदर्शन देणे हे होते. कार्यक्रमाची सुरुवात जाय जय महाराष्ट्र माझा या गीताने झाली.त्यानंतर उपस्थित सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. विभागातील विविध जिल्ह्यांमधून आलेले प्राचार्य, जिल्हा समन्वयक, तालुका समन्वयक, ज्येष्ट प्राध्यापक आणि करिअर कट्टा समन्वयक यांच्या उपस्थितीमुळे सभागृहात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. प्रास्ताविक करताना स.भु.कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विवेक मिरगणे यांनी करिअर कट्टा हा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी, नेतृत्व गुणांच्या वृद्धीसाठी, रोजगाराभिमुख कौशल्यांच्या विकासासाठी तसेच संशोधन व उद्योजकता वाढीसाठी अत्यंत महत्त्वाचे उपक्रम असल्याचे सांगितले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकास, नवोपक्रमशीलता, स्टार्टअप संस्कृती, संशोधनाची आवड आणि सामाजिक बांधिलकी निर्माण करण्यासाठी करिअर कट्टा प्रभावी माध्यम ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले. विभागातील सर्व महाविद्यालयांनी नियोजनबद्ध पद्धतीने उपक्रम राबविण्याचे आवाहनही त्यांनी केले. यानंतर करिअर कट्टाचे प्रमुख मार्गदर्शक मा. यशवंत शितोळे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी आगामी शैक्षणिक वर्षात राबविण्यात येणाऱ्या सर्व उपक्रमांचे सादरीकरण करून प्रत्येक उपक्रमाची उद्दिष्टे, अंमलबजावणीची पद्धत आणि अपेक्षित परिणाम स्पष्ट केले.सर्वप्रथम विभागीय Startup Summit च्या आयोजनाबाबत चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता विकसित करण्यासाठी स्टार्टअप परिसंस्था, उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन, यशस्वी उद्योजकांचे अनुभव, व्यवसाय आराखडा (Business Model) तयार करणे, आर्थिक सहाय्याच्या संधी, इनक्युबेशन सेंटरशी समन्वय आणि नवकल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी विभागीय स्तरावर भव्य स्टार्टअप समिट आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर Pre-Avishkar Orientation Workshop बाबत चर्चा झाली. विद्यार्थ्यांमध्ये संशोधन संस्कृती विकसित करण्यासाठी संशोधन विषय निवड, संशोधन पद्धती, संशोधन लेखन, सादरीकरण कौशल्ये, पोस्टर प्रेझेंटेशन, संशोधनातील नैतिकता आणि अविष्कार स्पर्धेसाठी आवश्यक मार्गदर्शन देण्याचे नियोजन करण्यात आले. प्रत्येक महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना संशोधनासाठी प्रोत्साहित करून मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले.दिनांक२७ जुलै २०२६ ते १ ऑगस्ट २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात येणाऱ्या Faculty Development Programme (FDP) विषयी सविस्तर माहिती देण्यात आली. या प्रशिक्षणामध्ये अध्यापनातील आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), डिजिटल साधनांचा वापर, विद्यार्थी-केंद्रित अध्यापन पद्धती, संशोधन क्षमता विकास, शैक्षणिक गुणवत्ता वृद्धी आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी या विषयांवर प्रशिक्षण दिले जाणार असल्याचे सांगण्यात आले. यानंतर Induction Awareness Week संदर्भात चर्चा करण्यात आली. प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन वातावरणाशी परिचित करून देणे, करिअर कट्टा, एनएसएस, विद्यार्थी विकास मंडळ, विविध शिष्यवृत्ती योजना, रोजगाराच्या संधी, स्पर्धा परीक्षा, व्यक्तिमत्त्व विकास, कौशल्य विकास आणि उद्योजकता यांची माहिती देण्यासाठी विशेष उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. करिअर कट्टा अंतर्गत Innovation Club, Startup Club, Research Club, Reading Club, Leadership Club, Environment Club, Constitution Club, Entrepreneurship Club यांसारखे विविध विद्यार्थी क्लब प्रत्येक महाविद्यालयात स्थापन करण्याबाबत सविस्तर आराखडा निश्चित करण्यात आला. या क्लबच्या माध्यमातून वर्षभर सातत्याने विविध उपक्रम राबविण्याचे ठरविण्यात आले. बैठकीत जिल्हास्तरीय विद्यार्थी संवाद आणि एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यासंदर्भात सविस्तर चर्चा झाली. विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन, स्पर्धा परीक्षा, उच्च शिक्षण, उद्योग, स्टार्टअप, संशोधन आणि रोजगाराच्या विविध संधींबाबत तज्ज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले. प्रत्येक जिल्ह्यात निश्चित कालावधीत या कार्यशाळा आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला.त्यानंतर जिल्हा नियोजन समितीतील आवश्यक फेरबदल, नवीन सदस्यांची निवड, जबाबदाऱ्यांचे वाटप आणि समन्वय व्यवस्था अधिक मजबूत करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रत्येक जिल्ह्याने नियमित बैठकांचे आयोजन करण्याचे निर्देश देण्यात आले.कार्यक्रमात नव्याने नियुक्त झालेल्या तालुका समन्वयकांना नियुक्तीपत्रांचे वितरण करून त्यांचा गुलाब पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे करिअर संसदेतील नव्याने नियुक्त मुख्यमंत्री आणि संसद पदाधिकारी व समन्वयक यांचाही गौरव करून त्यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थी विकासाचे विविध उपक्रम राबविण्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला. शेवटी अध्यक्षीय समारोपात विभागीय प्राचार्य प्रवर्तक डॉ.भारत खंदारे यांनी करिअर कट्टा हा केवळ रोजगाराभिमुख उपक्रम नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकास, नेतृत्व क्षमता, सामाजिक उत्तरदायित्व, संशोधन वृत्ती, नवोपक्रमशीलता आणि उद्योजकता विकसित करणारा व्यापक उपक्रम असल्याचे प्रतिपादन केले. विभागातील सर्व महाविद्यालयांनी परस्पर समन्वय, वेळेचे नियोजन आणि गुणवत्तापूर्ण अंमलबजावणीवर भर देऊन प्रत्येक विद्यार्थी करिअर कट्टाशी जोडला जाईल यासाठी प्रयत्न करावेत, असे त्यांनी सांगितले. व्यासपीठावर छत्रपती संभाजीनगर,जालना,बीड आणि धाराशिव जिल्ह्यातील प्राचार्य प्रवर्तक ऊपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन डॉ.लक्ष्मीनारायण कुरुपटवार,डा.वैशाली पेरके यांनी प्रभावीपणे केले. त्यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे वेळेचे नियोजन उत्कृष्टरीत्या सांभाळले. सूत्रसंचालन डॉ. पानझडे यांनी केले आणि आभार प्रदर्शन डॉ. पोपळघट यांनी केले. त्यांनी उपस्थित सर्व मान्यवर, प्राचार्य, विभागीय व जिल्हा समन्वयक, तालुका समन्वयक, प्राध्यापक, कर्मचारी आणि सहभागी प्रतिनिधी यांचे मनःपूर्वक आभार मानले.कार्यशाळेच्या शेवटी करिअर कट्टाचे सर्व नवनियुक्त मुख्यमंत्री आणि पदाधिकारी व सर्व मान्यवरांचे ग्रुप फोटो काढण्यात आले. आणि स्वादिष्ट आणि ऊत्तम जेवणाने कार्यशाळेची सांगता झाली. विभागीय स्तरावर करण्यात आलेल्या नियोजनामुळे आगामी शैक्षणिक वर्षात करिअर कट्टा अधिक सक्षम, परिणामकारक आणि विद्यार्थीकेंद्रित पद्धतीने कार्य करे, असा विश्वास सर्व उपस्थितांनी व्यक्त केला. ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी सर्वोत्तम प्रयत्न विभागीय समन्वयक डा.कुरुपटवार यांनी केले.करिअर कट्टा हा विभाग नेहमी नवोपक्रम आणि विद्यार्थी विकासाच्या दृष्टीने अत्यंत यशस्वी, प्रेरणादायी आणि फलदायी ठरला असे मत व्यक्त केले.

प्रतिनिधी नेमणे आहे
महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राधान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.
दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनीवार २५ जुलै २०२६

## राजीव गांधी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वच्छता अभियान उत्साहात



**करमाड (प्रतिनिधी) :** राजीव गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, करमाड येथील राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाच्या वतीने महाविद्यालय परिसरात स्वच्छता अभियान उत्साहात राबविण्यात आले. या अभियानात प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत श्रमदानातून स्वच्छतेचा आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला. महाविद्यालयाच्या प्रांगणात स्वच्छता करून अभियानाची सुरुवात करण्यात आली. विद्यार्थ्यांनी झाडू, टिकाव, फावडे आदी साहित्य हातात घेऊन परिसर स्वच्छ केला. श्रमदानातून स्वच्छ परिसर, निरोगी समाज आणि जबाबदार नागरिक घडविण्याचा संदेश देत राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून प्रत्येक विद्यार्थ्याने समाजोपयोगी कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. बाळासाहेब लिहिणार यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्दिष्ट, श्रमसंस्कार आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. सह कार्यक्रम अधिकारी डॉ. कालिदास दिनकर फड यांनी स्वच्छता ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे सांगितले.या उपक्रमात डॉ. सुखदेव पोटदुखे, प्रा. मनोज देवकर, डॉ. नानासाहेब लावंड, प्रा. प्रशांत माठे, डॉ. इम्रान पठाण, प्रा. लक्ष्मण खरात, प्रा. अर्जुन चव्हाण, प्रा. शिंदे, प्रा. कोठाळे, डॉ. ललित गोल्डे, ज्ञानेश्वर जाधव, मधुकर राठोड तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आणि महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.अभियानाच्या शेवटी उपस्थितांनी महाविद्यालय परिसर कायम स्वच्छ ठेवण्याचा संकल्प केला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये श्रमाची प्रतिष्ठा, स्वच्छतेची सवय आणि समाजाप्रती असलेली जबाबदारी अधिक दृढ झाली.

## हायड्रोलीक टेस्टिंग न करता चंचु प्रयोगाने पाणी पुरवठा घाई घातक ठरेल - राजेंद्र दाते पाटील

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** : नक्षत्रवाडी ते हर्सूल १५०० मिमी पाइपलाइन द्वारे पाणी दाखल झाल्याचा गावगवा होत आहे परंतु हायड्रोलीक टेस्टिंग न घेणेअत्यंत चुकीचे असुन असे कुठलेही क्षणिक सुखाचे प्रयोग मनपा आणि नागरिकां साठी कायम स्वरूपी घातक तर ठरतीलच परंतु हायड्रोलीक टेस्टिंग न करता चंचु प्रयोगाने पाणी पुरवठा करण्याची घाई अधिक घातक ठरेल असे स्पष्ट प्रतिपादन जेष्ठ जल अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी केले आहे. मुबलक व वक्ताशीर पाणी पुरवठा व्हावा म्हणून त्यांनी सर्व प्रथम जनहीत याचीका केली होती गेली तीन दशका पासुन ते लढा देत आहे हे विशेष होय.उलट हायड्रोलीक टेस्टिंग न करता ही योजना ताब्यात घेणे ही प्रक्रिया बारकाईने पाहिले नाही तर यातील गळतीचा शोध भविष्यात कधीच लागणार तर नाहीच उलट भविष्यात पाण्याचे प्रेशर मेंटेन न झाल्यामुळे पाईप लाईन फुटतील आणि मग याचा " ठिकरा " मनपा वर सतत फुटत राहील पर्यायाने पाणी पुरवठा विभागा वर राहील. हायड्रोलीक टेस्टिंग शिवाय मनपाने योजना ताब्यात घेऊ नये ही घाई म्हणजे " एका महिन्याची घाई,आयुष्यभर संकटात नेई " असे होणार हे निश्चित असुन उदाहरण द्यायचे झाल्यास जालना अंबड पाणीपुरवठा योजनेची पाईपलाईनला महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाने घेतली पाईप लाईनचे आतुन अस्तरीकरण केले नव्हते.तीन वर्षानंतर जल वाहिनीला पत्रा पातळ होऊन छिद्र पडण्यास सुरुवात झाली. त्यामुळे अशा प्रकारची घाई करणे अत्यंत चुकीचे आहे.लाभार्थी लोकांच्या " पाणी द्या पाणी द्या " या घाईमुळे ते तसेच राहून जाणार आहे. तीन वर्षानंतर जलवाहिनीला पत्रा पातळ होऊन छिद्र पडण्यास सुरुवात झाली. त्यामुळे अशा प्रकारची घाई करणे अत्यंत चुकीचे आहे. घाई करूनही छत्रपती संभाजीनगर शहराला पाणी भेटणार नाही हे विशेष ठरणार आहे.छत्रपती संभाजीनगर शहरासाठी अत्यंत महत्त्वाची असलेल्या नव्या पाणी पुरवठा योजनेची प्रत्यक्ष चाचणी यशस्वी झाली अशी घोषणा अयोग्य व अतांत्रिक ठरणारी असुन तीन दशकाच्या दीर्घ प्रतीक्षे नंतर अखेर नव्या योजनेचे पाणी शहरात दाखल झाले हे भासवण्याचा प्रयत्न म्हणजे ही योजनाच गर्तेतेत आणण्याची सुरुवात झाली असे म्हणता येईल, म्हणुन सावध गिरी बाळगणे आवश्यक आहे. प्रश्न बऱ्याच अंशी मार्गी लागणार हे म्हणणे असत्य ठरेल सिडको एन-५ मधील पाणी टाकीत हे पाणी सोडून त्याचे वितरण सुरू केले असे म्हणणे म्हणजे सिडकोतील तीव्र पाणीटंचाईचा प्रश्न बऱ्याच अंशी मार्गी लागणार ही फक्त घोषणाचं ठरेल कारण नक्षत्रवाडी ते हर्सूल ही १५०० मिमी व्यासाची १७.९० किमी जलवाहिनी टाकण्यात आल्याचे सांगितले जात असुन त्यापैकी सिडको एन-१ मधील पिरॅमिड चौका पर्यंतची पाईप लाईन स्वच्छ करून तयार करण्यात आली हे म्हणण्या पूर्वी प्रशासनाने या पाईपची लाईनची हायड्रोलीक टेस्टिंगच केलेली नाही -अशा स्थितीत ही तांत्रिक चुक " गुत्तेदाराची "की "महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची "की "मनपाची "की सगळे चुपचाप सहन करणाऱ्या जनतेची? असा महत्वाचा सवाल जेष्ठ जलअभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी प्रशासना समोर उपस्थित केला आहे.नुकतेच २२ जुलै २०२६ रोजी पिरॅमिड चौकातील व्हॉल्व्ह उघडून सिडको एन-५ च्या जलकुंभ २ व ३मध्ये पाणी सोडण्यात आले. यादरम्यान जुन्या योजनेचा पाणीपुरवठा सुरळीत राहणार असल्याने नव्या योजनेतून मिळणारा हा पाणीपुरवठा अतिरिक्त असणार असल्याचा दावा केला गेला आहे.लोक प्रतिनिधी आणि प्रशासनिक अधिकारी जे.व्ही.पी.आर या कंत्राटदाराचे प्रतिनिधी सुद्धा या वेळी उपस्थित होते.पाणी ३१जुलै पर्यंत पोहोचण्याचा दावा तीन दशका नंतर शहरात नवीन पाणी योजना प्रत्यक्षात येण्यासाठी तीन दशके लागले असे म्हणत पाण्याची बेरीज दाखवताना ४ एमएलडी पाणी सध्या एन-५ मधील टाक्यात दररोज दिवसा तून तीन वेळा भरता येतील १५०० मिमी नक्षत्रवाडी ते हर्सूल टाकलेल्या मुख्य पाइपलाईनचा व्यास आहे.जास्तीत जास्त ३५ एमएलडी पाणी एकावेळी जल वाहिनीतून पाणी पुरवठा होणार असे चित्र उभे होत असुन १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिना पर्यंत १० जलकुंभा पर्यत पोहचवण्याचे मनपा प्रशासनासचे लक्ष असल्याचे चित्र उभे होत असुन सावध पवित्रा बाळगून सन्माननीय न्यायालयाने अविरत केलेला पाठपुरावा प्रशासनाचे कळत असूनही अतांत्रिक प्रयत्न आणि गोरगरीब नागरिकांनी पाळलेला प्रचंड संयम यांची सांगड घालुन मनपा व प्रशासन काय संदेश देण्याचा प्रयत्न करीत आहे हेत्यांनाच ठाऊक एक दोन दिवस पाणी पुरवठा मागे पुढे होणे म्हणजे यशस्वी वाटचाल आहे असे कसे म्हणता येईल ?असा महत्वाचा सवाल जेष्ठ जलअभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी प्रशासना समोर उपस्थित केला आहे. फक्त शक्यता वर्तविल्या जात आहेत विशिष्ट भागातील पाणी देण्याच्या स्थितीत या नवीन योजनेतून जास्तीचे पाणी उपलब्ध होईल हा दावा काय फक्त सात - आठ दिवसा आड होणाऱ्या पाणी पुरवठ्या च्या टप्यात एक ते दोन दिवसांची घट या साठी प्रशासन करत आहे काय? आणि ही प्रशासनाच्या वतीने फक्त शक्यता वर्तविली जात आहे असे स्पष्ट झाले आहे.






# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनीवार २५ जुलै २०२६


# राज्यात डेंग्यू-हिवतापाचा कहर!



**मुंबई :** राज्यात यंदा सर्वत्र झालेल्या दमदार पावसामुळे साथीच्या आजारांचा धोका वाढला असून, २१ जुलै २०२६ पर्यंत डेंग्यूचे ३,७६२ तर हिवतापाचे २,०३६ रुग्ण आढळून आले आहेत. ही वाढती रुग्णसंख्या आणि साथ आजारांचा संभाव्य उद्रेक लक्षात घेऊन आरोग्य विभागाने सतर्क होत तातडीने पावले उचलली आहेत. ज्याअंतर्गत ताप सर्वेक्षण, रक्तनमुन्यांची तपासणी, प्रभावी कीटकनाशक फवारणी आणि व्यापक जनजागृती अभियानावर विशेष भर देत या आजारांचा प्रसार रोखण्यासाठी युद्धपातळीवर प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविल्या जात आहेत.

आरोग्य विभागाच्या ताज्या आकडेवारीनुसार, यंदा २१ जुलैपर्यंत राज्यात डेंग्यू आणि चिकुनगुन्याच्या वाढत्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर संशयित रुग्णांची व्यापक पातळीवर तपासणी करण्यात आली. या मोहिमेअंतर्गत डेंग्यूसाठी तपासण्यात आलेल्या ४८ हजार ३४२ रक्तनमुन्यांपैकी ३,७६२ जणांचे अहवाल पॉझिटिव्ह आले आहेत. तर चिकुनगुन्यासाठी तपासलेल्या २३ हजार १११ नमुन्यांमधून ७८४ जणांना या आजाराची लागण झाल्याचे निष्पन्न झाले असून, सध्या या सर्व रुग्णांवर योग्य ते वैद्यकीय उपचार सुरू आहेत.

राज्यात हिवतापावर (मलेरिया) नियंत्रण मिळवण्यासाठी आरोग्य विभागाने विशेष लक्ष केंद्रित केले असून, अतिसंवेदनशील आणि उद्रेकग्रस्त गावांमध्ये घरोघरी जाऊन कीटकनाशकांची फवारणी, ताप असलेल्या रुग्णांचे सर्वेक्षण आणि त्यांच्यावर तातडीने औषधोपचार करण्यावर भर दिला जात आहे. ताज्या आकडेवारीनुसार, यंदा २१ जुलैपर्यंत राज्यात हिवतापाचे एकूण २०३६ रुग्ण आढळून आले आहेत. ज्यापैकी ५४६ रुग्ण हे राज्याबाहेरून आलेले आहेत. राज्याने २०३० सालापर्यंत हिवतापाचे संपूर्ण निर्मूलन करण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट निश्चित केले असून, त्या दिशेने प्रशासनाकडून युद्धपातळीवर विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविल्या जात आहेत.

दुसरीकडे, डेंग्यू आणि चिकुनगुन्यासारख्या आजारांचा प्रसार रोखण्यासाठीही प्रभावी पावले उचलली जात आहेत. याअंतर्गत संशयित रुग्णांचे रक्तनमुने तपासणीसाठी पाठवणे, साथ असलेल्या भागात धूर फवारणी करणे, साठवलेल्या पाण्यात 'टेमिफॉस'चा वापर आणि कायमस्वरूपी पाणीसाठ्यांमध्ये डास अळ्या खाणारे गप्पी मासे सोडणे यांसारख्या उपाययोजनांसह नागरिकांमध्ये डासांची उत्पत्ती रोखण्याबाबत व्यापक जनजागृती केली जात आहे. वाढता धोका लक्षात घेता, नागरिकांनी आपले घर आणि परिसरात कुठेही उघड्यावर पाणी साचू देऊ नये, तापाची प्राथमिक लक्षणे दिसताच तातडीने जवळच्या शासकीय आरोग्य केंद्रात जाऊन वैद्यकीय तपासणी करून घ्यावी आणि डासांपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक ती सर्व खबरदारी घ्यावी, असे महत्त्वपूर्ण आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.

# बदलतं अंबाजोगाई शहर लेख क्र.२

आरोग्य सुविधांसाठी १५८२ कोटी...!बीड जिल्हा विकसित करताना सर्वांगीण विकास लक्षात घेऊन नियोजन करण्यात आले आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात आरोग्य सेवेचा विस्तार देखील करण्यात येत आहे. त्यात अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकिय महाविद्यालय आणि रूग्णालयाच्या क्षमतावृद्धी सोबतच इमारतीचा देखील विस्तार करण्याचे नियोजन आहे. अंबाजोगाई हे अनेक वर्षापासून जिल्ह्यातीलच नवे तर लगतच्या जिल्ह्यातील रूग्णांसाठी मोठे केंद्र बनलेले आहे. याठिकाणी बीडसह लातूर जिल्ह्यातून तसेच लगतच्या धाराशीव जिल्ह्यातून येणाऱ्या रूग्णांची संख्या अधिक असते. महाविद्यालय देखील असल्याने वैद्यकीय शिक्षणासाठी देखील हे महत्त्वाचे ठिकाण आहे. महाविद्यालय व रूग्णालयाच्या ताब्यात एकूण स्वत:च्या नावे ५८ हेक्टर जागा आहे. सध्याची उपलब्ध व्यवस्था विकसित करण्यासाठी एक बृहद आराखडा करण्यात आला आहे. यासाठी १ हजार १०६ कोटींची तरतूद करण्यात आलेली आहे. नवीन आराखड्यात येथे परिपूर्ण असे आरोग्य व्यवस्था आणि साधने असावीत यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. अद्ययावत असे ऑपरेशन थिएटर, रेडिओलॉजी यंत्रणा, महिला व बालक कक्ष, अतिदक्षता कक्ष तसेच अत्यावश्यक सेवा ठरणारी रक्तपेढी अर्थात ब्लड बँक आणि प्रयोगशाळा या रूग्णालयात असणार आहेत. महाविद्यालयाची आवश्यकता लक्षात घेऊन महाविद्यालयासाठी अद्ययावत असे शिक्षण कक्ष परीक्षेसाठी स्वतंत्र असा हॉल अभ्यासिका आणि ग्रंथालय या सुविधा निर्माण केल्या जाणार आहेत. वैद्यकीय सुविधा विस्तार अंतर्गत उपचारासाठी लागणारे ऑक्सीजन व त्यासोबतची यंत्रणा अखंड वीजपुरवठा रहावा यासाठी यंत्रणा रूग्ण व त्यांचे नातेवाईक यांच्यासह रूग्णालयासाठी अत्यावश्यक असणारी पाणीपुरवठा व्यवस्था सोबतच रूग्णालय इमारतीसाठी वातानुकुलन यंत्रणा देखील असेल. सुरक्षा यंत्रणा ज्यात सर्व महाविद्यालय आणि रूग्णालय यांचा एकत्रित विचार करण्यात आला आहे. रूग्णालय म्हटल्यावर बायो-मेडिकल वेस्ट मोठ्या प्रमाणावर निर्माण होत असते. त्याचे व्यवस्थापन पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे ठरते. त्याचीही व्यवस्था या ठिकाणी उभारण्यात येईल. बीड शहर आणि अंबाजोगाई हे अंतर खूप अधिक आहे. बीड हे जिल्ह्याचे ठिकाण असल्याने येथे असलेली जिल्हा रूग्णालय देखील अद्ययावत असणे आवश्यक आहे. याचाही विचार करून नियोजन करण्यात आले आहे. जिल्हा रूग्णालयाची क्षमता वाढवून येथे ३६० खाटांची व्यवस्था निर्माण करण्यात येणार आहे. यासाठी ३०४ कोटी रूपयांचा वेगळा आराखडा तयार करण्यात आला आहे. यात रूग्णालय इमारतीचे विस्तारीकरण प्रशासकीय इमारत बांधकाम रेडिओलॉजी, मोर्चरी आणि पार्किंगची व्यवथा या सर्वांचा समावेश या आराखड्यात आहे.रूग्णालयाची आवश्यकता व शिक्षण सुविधा विस्तार या अंतर्गत बीड मध्ये नवे नर्सिंग महाविद्यालय आणि वस्तीगृह देखील उभारले जाणार आहे. यासाठी ४.२२ हेक्टर जागा हस्तांतरणाची प्रक्रिया सुरू झाली आहे. महाविद्यालय आणि वस्तीगृह उभारणी यासाठी १७२ कोटी रूपयांचा स्वतंत्र असा आराखडा आहे. जिल्ह्यात सर्वांगीण विकासात आरोग्य सेवा देखील महत्त्वाची आहे. याच भूमिकेतून १५८२ कोटींहून अधिकची कामे आणि सूविधा होणार असल्याने बीड जिल्ह्यात याचा फायदा होईल आणि नागरिकांना योग्य आणि माफक अशी वैद्यकीय सेवा देखील प्राप्त होईल



**- भगवंत पाळवदे, अंबाजोगाई**